Printed from

महाराष्ट्र टाइम्स The Maharashtra Times -Breaking news, views. reviews, cricket from across India

# आळसाचे फळ रोकडे

7 Oct 2011, 0459 hrs IST

SMS NEWS to 58888 for latest updates

समर्थ रामदासस्वामींना आस होती ती समाज घडवण्याची. समाज घडवण्यासाठी सक्षम माणूस घडवणे आवश्यक आहे ते ते जाणून होते . हा माणूस घडवण्यासाठी मानवी स्वभावातल्या विविध दोषांवर, उणिवांवर समर्थांनी अगदी अचूक टिपणी केली आहे.

माणसाच्या स्वभावातला सगळ्यात मोठा दुर्गुण म्हणजे आळस. समर्थ म्हणतात, आळसाचे पूढ रोकडे । जांभया देऊन निदा पडे। सुख म्हणौन आवडे । आळसी लोकां।। म्हणजे आळसाचे फळ अगदी रोकडे- तात्काळ मिळते आणि ते म्हणजे झोप. जांभया देऊन झोप काढायला वेळ लागत नाही. आळशीपणातून मिळणारे हे सुख सर्वांना आवडते. पण असा आळशीपणाकरून तुम्ही स्वत:ची प्रगती खुंटविता. जीवनात काही करायचे असेल, यशस्वी व्हायचे असेल तर असा आळशीपणा करून कसे चालेल? समर्थ रामदासस्वामी सांगतात, आळसातून उदासपणा म्हणजे निष्क्रीयता येते. आळशी-पणामुळे प्रयत्न करण्याची इच्छाच मरून जाते. आळसातून फक्त करंटेपणाच्या खुणाच दिसू लागतात. जे लोक आधी कष्टाचे, श्रामाचे दु:ख सोसतात, त्यांनाच पुढे सुखाचे फळ मिळते. पण जे आधी आळशीपणाचे सुख (!) भोगतात त्यांना पुढे दु:ख सोसावे लागते.

समर्थ सांगतात, झिजल्या-वांचुनि कितीर् कैची। मान्यता नव्हे की फुकाची। स्वत: कष्ट केल्या-शिवाय, कार्यक्षमता दाखवल्या-शिवाय तुमची कीतीर् होणार नाही. कोणालाही काहीही न करता, फुकाफुकी मान्यता मिळत नाही. आळसासारखे दुर्गुणच दाखवलेत तर सर्वत्र तुमची अवहेलनाच होईल. 'यत्न तो देव जाणावा' या विचाराचा पुरस्कार समर्थांनी सातत्याने केला. त्यांच्या काळातील सामाजिक-राजकीय परिस्थिती पाहता हतबल झालेल्या, निष्क्रीय बनलेल्या समाजात चेतना निर्माण करण्यासाठी आळशी मनोवृत्तीवर ताशेरे ओढून, समाजाला विशेषत: तरुणांना कार्यप्रवृत्त करण्याचे राष्ट्रीय काम आवश्यकच होते. पण समर्थांचा हा उपदेश आजही लागू पडतो. देशातले तरुण जर स्वत:चे भविष्य घडवायचे सोडून, चैनीत मश्गुल झाले तरे त्यांच्या भविष्याबरोबरच देशाचे भविष्यही झाकोळले जाईल. अनेकदा एखादे काम आपल्याला आवाक्याबाहेरचे वाटते आणि मग ते शक्यच नाही म्हणून आपण आळशीपणाने ते काम टाळतो. पण समर्थ म्हणतात, तुम्ही प्रयत्नच केला नाहीत तर काहीच होणार नाही.

आमच्या निरगुडकर घराण्याचा १० पिढ्यांचा इतिहास शोधून, तो ग्रंथबद्ध करावा असं माझ्या मनात आलं. अनेकांनी ही कल्पना अव्यहार्य असल्याचे सांगितले. पण मी प्रयत्न केला आणि अनेक अडचणींचा सामना करून अवाहन यात्रा हा निरगुडकर घराण्याचा ९५० वर्षांचा इतिहास सांगणारा ग्रंथ सिद्ध केला. मी आळशीपणा करून कामाला सुरुवात केली नसती तर हे संशोधन झालेच नसते. पण आज आयुष्यातील सर्वात अभिमानास्पद काम केल्याचं समाधान मिळालं आहे.

' म्हणौन आळस नसावा। तरीच पाविजे वैभवा।' हे समर्थांनी सांगितलेलं समाधान मिळण्यासाठी आळस झटकून टाका, प्रयत्नांमध्ये कसूर करू नका, कष्टांना घाबरू नका. अन्यथा कीतीर्, यश, वैभव, समाधान मिळण्याऐवजी आळसाचे रोकडे फळ म्हणजे निव्वळ झोप फक्त पदरात पडेल.

- डॉ. सुधीर निरगुडकर

Network Access Message: The page

Tweet या बातमीला ट्विट करा

**या बातमीवर तुमचं मत मांडण्यासाठी** इथे क्लिक करा.

इतर बातम्यांचे व्हिडिओ पाहण्यासाठी क्लिक करा

Powered by Indiatimes

About Us | Advertise with Us | Terms of Use | Privacy Policy | Feedback | Sitemap

Copyright © 2011 Bennett Coleman & Co. Ltd. All rights reserved. For reprint rights: Times Syndication Service

This site is best viewed with Internet Explorer 6.0 or higher Firefox 2.0 or higher at a minimum screen resolution of 1024x768